वर्ष - 8 । अंक -90 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आजचा रंग पांढरा

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 07 ऑक्टोबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## मुळा नदीकाठ विकास पुणे महापालिकेला डोईजड ठरणार

# 42 कोटी रुपये 'पाण्यात'?

### वाकड बायपास ते सांगवी पुलापर्यंतचा 8.5 किलोमीटरपर्यंतचा प्रकल्प 'पीपीपी' तत्त्वावर

। पुणे । महाईन्यूज

**लोकसभा निवडणुकीचा धुरळा बसला असून आता उत्सुकता ४ जूनला होणाऱ्या मतमोजणीची आहे. त्यातच लोकसभा निवडणुकीत तटस्थ राहणाऱ्या मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी सुरु केली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच मतदारसंघातून 288 उमेदवार उभे करणार असल्याची घोषणा मनोज जरांगे यांनी केली आहे.**



मुळा नदीच्या दोन्ही काठांचा विकास करण्यासाठी पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांनी या काढलेल्या निविदा भिन्न दराने आल्यामुळे पुणे महापालिकेला किमान ४२ कोटी रुपयांचा फटका बसण्याची शक्यता आहे. या निविदा मंजूर करण्यासाठी राज्यातील बड्या मंत्र्याचा दबाव असल्याने महापालिकेतील अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. दोन्ही महापालिकांनी आपापल्या हद्दीतील वाकड बायपास ते सांगवी पुलापर्यंतच्या (वाकड बाह्यवळण ते औंध) नदीकाठ विकासासाठी निविदा काढल्या होत्या. या प्रकल्पाबाबत राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणामध्ये (एनजीटी) दाखल याचिका निकाली निघाल्यावर स्थगित निविदा प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली. एकाच प्रकारचे काम नदीच्या दोन्ही काठांवर होणार असल्याने ठेकेदारांकडून देण्यात येणारे या कामांचे दर थोड्याबहुत प्रमाणात सारखे असणे अपेक्षित होते. पिंपरी-चिंचवडच्या तुलनेत पुणे महापालिकेतील निविदांचे दर जास्त आहेत. त्यामुळे या निविदांना मंजुरी कशी द्यायची, असा प्रश्न पुणे महापालिकेतील अधिकाऱ्यांना पडला आहे. प्रकल्प 'पीपीपी' तत्त्वावर वाकड बायपास ते सांगवी पुलापर्यंतचा साडेआठ किलोमीटरपर्यंतचा पुणे महापालिका हद्दीतील नदीकाठ विकसित करण्याचा प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारीतून (पीपीपी) करण्यात येत आहे. या प्रकल्पाची निविदा तीन वेळा प्रसिद्ध करण्यात आली होती. अंतिमतः प्रकल्पासाठी दोन कंपन्यांनी पुढाकार दर्शविला. पुणे महापालिकेच्या पूर्वगणन पत्रकानुसार (एस्टिमेट) या प्रकल्पासाठी ३०३.९१ कोटी रुपये खर्चण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्वात कमी दराची निविदा (३०३.६० कोटी रुपये) 'जे. कुमार इन्फ्रा प्रोजेक्ट लिमिटेड' या कंपनीने सादर केली होती. चर्चा केल्यानंतर आणखी ३० लाख रुपये कमी करून काम करण्यास कंपनीने तयारी दर्शविली.

### पिंपरी-चिंचवड पालिका करणार खर्च

पिंपरी-चिंचवड महापालिकेने त्यांच्या हद्दीतील कामाची निविदा प्रसिद्ध केली होती. पूर्वगणन पत्रकानुसार या कामासाठी ३२० कोटी रुपयांचा खर्च निश्चित करण्यात आला. बी. जी. शिर्के कंपनीने हे काम १४ टक्के कमी दराने म्हणजे २७४ कोटी रुपयांमध्ये करण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे त्यांना कार्यादेश देण्याची प्रक्रिया सुरू आहे. दोन्ही महापालिकांकडून सुमारे नऊ किलोमीटरचा नदीकाठ विकसित करण्यात येणार आहे. नाल्यांवर 'इंटरसेप्टर' बसवून दूषित पाणी नदीपात्रात जाण्यास थांबवणे आणि नदीकाठ सुशोभीकरणाचा अंतर्भाव आहे.

### मंत्र्याच्या दबावामुळे पेच

या प्रकल्पातील निविदांची छाननी करण्यासाठी नियुक्त समितीची बैठक शुक्रवारी सकाळी महापालिकेत झाली. या वेळी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या १४ टक्के कमी दराने आलेल्या निविदांची चर्चा झाली. पुण्यातील खर्च 'पिंपरी-चिंचवड' पेक्षा कमी असताना केवळ 'पीपीपी' तत्त्वामुळे पुणे महापालिकेचे दर वाढले आहेत. त्यातच या निविदांना मंजुरी देण्यासाठी राज्यातील एका 'दादा' नेत्याने महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्यावर दबाव आणल्याची चर्चा आहे. छाननी समितीत यावर जोरदार चर्चा झाली असली, तरी अंतिम निर्णय झालेला नाही. या समितीतील एक बडा अधिकारी बैठकीस अनुपस्थित राहिला.

## अजित पवार शिरूरमधून निवडणूक लढविणार?

### अजित पवार विरुद्ध (शरद पवार) पक्षाचे विद्यमान आमदार अशोक पवार अशी लढत होण्याची शक्यता

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

बारामतीमधून निवडणूक न लढविण्याचे संकेत देणारे उपमुख्यमंत्री अजित पवार शिरूरमधून लढण्याची शक्यता आहे. हा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो. तेथे अजित पवार विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे विद्यमान आमदार अशोक पवार अशी लढत होण्याची शक्यता आहे.



अजित पवार यांनी बारामती विधानसभेची जागा न लढण्याचे संकेत गुरुवारच्या मेळाव्यात दिले होते. त्यानंतर दादा कोणत्या मतदारसंघातून निवडणूक लढविणार, याची कार्यकर्त्यांमध्ये चर्चा आहे. आता शिरूर मतदारसंघातून निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने चाचपणी सुरू केल्याची माहिती पक्षातील सूत्रांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि आमदार अशोक पवार यांनी शरद पवार यांच्या समवेत राहण्याचा निर्णय घेतला होता. लोकसभा निवडणुकीपूर्वी शिरूरमध्ये झालेल्या मेळाव्यात अजित पवार यांनी विद्यमान खासदार आणि आमदारांना आव्हान दिले होते. 'मंत्रिपद तर लांबच, आमदारच कसे होतो ते मी पाहतोच,' असा इशारा अजित पवार यांनी अशोक पवार यांना दिला होता. या पार्श्वभूमीवर अजित पवार शिरूरमधून रिंगणात उतरल्यास अशोक पवार यांच्यापुढे मोठे आव्हान उभे राहील.

### कोणत्याही मतदारसंघातून विजयी होतील

दरम्यान, अजित पवार केवळ बारामती किंवा शिरूरमधूनच नव्हे, तर राज्यातील कोणत्याही मतदारसंघातून विजयी होऊ शकतात अशी प्रतिक्रिया पक्षाचे पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी दिली आहे.

# लाडकी बहिण योजनेमुळे शेतकऱ्यांचे हाल

## हमीभावाने खरेदी होत नसल्यामुळे शेतकऱ्यांची लूट

।पुणे । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**केंद्र आणि राज्य सरकारने विविध उपाययोजना केल्यानंतरही सोयाबीन, उडीद, मुगाला अद्यापही हमीभाव मिळत नाही. शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा सरासरी ५०० रुपये कमी दराने शेतीमालाची विक्री करावी लागत आहे.**



महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील बाजार समित्यांमध्ये खरीप हंगामात उत्पादीत झालेल्या सोयाबीन, उडीद, मुगाची आवक वाढली आहे. शनिवारी (५ ऑक्टोबर) विदर्भ, मराठवाड्यातील बहुतेक सर्वच बाजार समित्यांमध्ये सोयाबीन आवक झाली. अकोट, वाशिम, अमरावती, जालना येथे मोठ्या प्रमाणावर सोयाबीन विक्रीसाठी येत आहे. शनिवारी जालन्यात सर्वाधिक २० हजार ७०६ क्विंटल सोयाबीन विक्रीसाठी आले होते. सोयाबीनला ४ हजार ८९२ रुपये हमीभाव जाहीर केलेला असतानाही खरिपातील या नव्या सोयाबीनला सरासरी ४ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला.मुगाची आवक फारशी होत नाही. तरीही ८ हजार ६८२ रुपये प्रतिक्विंटल हमीभाव असताना जेमतेम ७ हजार ते ७ हजार ५०० रुपयांचा दर मिळत आहे. उडदाची आवकही कमी आहे. वाशिम, सांगली, अकोला, जालना येथे हळूहळू आवक वाढत आहे. खरिपातील उडदाला ७ हजार ४०० रुपयांचा हमीभाव असतानाही ६ हजार ८०० रुपयांचा दर मिळत आहे. केंद्र सरकारनच्या घोषणेनुसार, नाफेड, एनसीसीएफच्या माध्यमातून उडीद आणि मुगाची १० ऑक्टोबरपासून आणि सोयाबीनची खरेदी १५ ऑक्टोबरपासून हमीभावाने खरेदी सुरू होणार आहे. नाफेड आणि एनसीसीएफने २०९ हमीभाव खरेदी केंद्रांना मंजुरी दिली आहे. सुमारे १३ लाख टन सोयाबीन, १७ हजार टन मुग आणि १ लाख ८ हजार टन उडदाची हमीभावाने खरेदी होणार आहे. शेतीमालांची हमीभावाने खरेदी सुरू झाल्यानंतर दरात काहिशी सुधारणा होण्याची शक्यता आहे.विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात गुलाबी वातावरण तयार केले जात आहे. प्रत्यक्षात शेतीमालाला हमीभावा इतकाही भाव मिळत नाही. सोयाबीन, उडीद, मुगाला हमीभावापेक्षा कमी दर मिळतो आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय परिस्थिती पाहता आगामी काळात शेतीमालाच्या दरात आणखी घसरण होण्याची शक्यता आहे. सरकारने भावांतर योजनेची नुसती घोषणा केली आहे. हमीभाव आणि प्रत्यक्ष मिळणारी किंमत यामधील फरक शेतकऱ्यांना देण्याइतका पैसा सरकारकडे नाही. मतांवर डोळा ठेवून राबविण्यात आलेल्या लाडकी बहिण योजनेसारख्या योजनांमुळे सरकारच्या तिजोरीत पैसाच नाही. राअसा आरोप अखिल भारतीय किसान सभेचे सरचिटणीस डॉ. अजित नवले यांनी केला आहे.महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील बाजार समित्यांमध्ये खरीप हंगामात उत्पादीत झालेल्या सोयाबीन, उडीद, मुगाची आवक वाढली आहे. शनिवारी (५ ऑक्टोबर) विदर्भ, मराठवाड्यातील बहुतेक सर्वच बाजार समित्यांमध्ये सोयाबीन आवक झाली. अकोट, वाशिम, अमरावती, जालना येथे मोठ्या प्रमाणावर सोयाबीन विक्रीसाठी येत आहे. शनिवारी जालन्यात सर्वाधिक २० हजार ७०६ क्विंटल सोयाबीन विक्रीसाठी आले होते. सोयाबीनला ४ हजार ८९२ रुपये हमीभाव जाहीर केलेला असतानाही खरिपातील या नव्या सोयाबीनला सरासरी ४ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला.मुगाची आवक फारशी होत नाही.

### हमीभावाने खरेदीची प्रतीक्षा

जालना येथे हळूहळू आवक वाढत आहे. खरिपातील उडदाला ७ हजार ४०० रुपयांचा हमीभाव असतानाही ६ हजार ८०० रुपयांचा दर मिळत आहे.केंद्र सरकारनच्या घोषणेनुसार, नाफेड, एनसीसीएफच्या माध्यमातून उडीद आणि मुगाची १० ऑक्टोबरपासून आणि सोयाबीनची खरेदी १५ ऑक्टोबरपासून हमीभावाने खरेदी सुरू होणार आहे. नाफेड आणि एनसीसीएफने २०९ हमीभाव खरेदी केंद्रांना मंजुरी दिली आहे. सुमारे १३ लाख टन सोयाबीन, १७ हजार टन मुग आणि १ लाख ८ हजार टन उडदाची हमीभावाने खरेदी होणार आहे. शेतीमालांची हमीभावाने खरेदी सुरू झाल्यानंतर दरात काहिशी सुधारणा होण्याची शक्यता आहे.

# बुधवारपासून राज्यभरात परतीचा पाऊस

## बंगालच्या उपसागरावरून बाष्पयुक्त वारे राज्यात येत आहेत

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातून मोसमी पावसाचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे. दुसरीकडे बंगालच्या उपसागरावरून बाष्पयुक्त वारे राज्यात येत आहेत. त्यामुळे बुधवारपासून ते शनिवारपर्यंत (१२ ऑक्टोबर) राज्यभरात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.**

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातून मोसमी वाऱ्यांचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे, तर दुसरीकडे बंगालच्या उपसागरावरून काही प्रमाणात बाष्पयुक्त वारे राज्याच्या दिशेने येत आहेत. त्यामुळे हवेच्या वरच्या स्थरात कोरड्या उष्ण वाऱ्याची आणि बाष्पयुक्त वाऱ्याची घुसळण होऊन विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. हा पाऊस शक्यतो सायंकाळी पडण्याचा अंदाज आहे. स्थानिक पातळीवर दुपारपर्यंत तापमान वाढून सायंकाळी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तविली केली आहे.भारतीय हवामान



विभागाने ऑक्टोबर महिन्यात राज्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली होती. त्या तुलनेत कमी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी व्यक्त केली आहे.साधारणपणे जेव्हा आसामकडील म्हणजे पूर्वोत्तर सात राज्यांत व हिमालयाच्या पायथ्याशी म्हणजे सिक्कीम हिमालयीन पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेशाचा हिमालयीन भाग येथे अति जोरदार पाऊस होतो. तेव्हा महाराष्ट्रासह संपूर्ण मध्य भारतात म्हणजे मध्य प्रदेश, छसत्तीगड या भागांत पावसाचे प्रमाण कमी होते. म्हणजेच कमी दाब क्षेत्रामुळे पडणारा पाऊस पूर्वेकडील सात राज्यांत व हिमालयाच्या पायथ्याशी पडतो. यंदा अशीच स्थिती निर्माण झाल्यामुळे ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात आपल्याकडे पावसाची शक्यता मावळली आहे.

### विजांचा कडकडाटासह पावसाची शक्यता

पण, ९ ते १३ ऑक्टोबर या काळात पावसाची शक्यता आहे, अशी माहिती हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातून मोसमी वाऱ्यांचा परतीचा प्रवास सुरू झाला आहे, तर दुसरीकडे बंगालच्या उपसागरावरून काही प्रमाणात बाष्पयुक्त वारे राज्याच्या दिशेने येत आहेत. त्यामुळे हवेच्या वरच्या स्थरात कोरड्या उष्ण वाऱ्याची आणि बाष्पयुक्त वाऱ्याची घुसळण होऊन विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. हा पाऊस शक्यतो सायंकाळी पडण्याचा अंदाज आहे. स्थानिक पातळीवर दुपारपर्यंत तापमान वाढून सायंकाळी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तविली केली.

## पृथ्वीराज चव्हाण यांचे मत, बेरोजगारी दूर झाली तर आरक्षणाचा

# एकही प्रश्न उभा राहणार नाही!

### दक्षिण कराड पुणे- पिंपरी चिंचवड रहिवासी यांच्यावतीने कौटुंबिक स्नेह मेळावा उत्साहात

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**छत्रपती शाहू महाराजांनी मराठा समाजास पहिल्यांदा पन्नास टक्के आरक्षण दिले. स्वातंत्र्यानंतर मराठा समाज मागास आहे, अशी मान्यता नव्हती. मला वाटतं बेरोजगारी दूर झाली तर आरक्षणाचा एकही प्रश्न उभा राहणार नाही, गेल्या कालखंडामध्ये आपल्याकडे एकही आयटी कंपनी आली नाही, उद्योग आले नाहीत, रोजगार निर्मिती झाली नाही, ही दुर्दैवाची बाब आहे, असे मत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केले. प्राधिकरणातील गदिमा नाट्यगृहात दक्षिण कराड पुणे- पिंपरी चिंचवड रहिवासी यांच्या वतीने कौटुंबिक स्नेह मेळावा सहभाग झाला. यावेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली. ज्येष्ठ पत्रकार समीरण वाळवेकर यांची प्रकट मुलाखत घेतली. त्यांनी कराडमध्ये झालेला पराभव, पंतप्रधान कार्यालयाचे मंत्री, येथपासून तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, त्यांनी घेतलेले निर्णय, महाराष्ट्राचे सध्याचे राजकारण, आरक्षण अशा विविध मुद्द्यांवर चव्हाण यांना बोलते केले.**



आणि माझा प्रभाव झाला!

सन १९९९ मध्ये कराडमधील पराभवाबाबत विचारले असता चव्हाण म्हणाले, " १९९९ मध्ये काँग्रेसमधून शरद पवार बाहेर पडले. आणि राष्ट्रवादीची स्थापना झाली. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात वेगळे वातावरण होते. पवार यांच्या रूपाने मराठी माणूस पंतप्रधानपदापर्यंत पोहोचू शकतो, असे वातावरण निर्माण झाले होते त्या विचारांनी माणसे एकत्र आली आणि माझा पराभव झाला."

### मग दहा वर्ष का लागली

मराठीला अभिजित दर्जा मिळाला, याविषयी चव्हाण म्हणाले, "मराठीला अभिजात दर्जा मिळावा, यासाठी आमच्या कालखंडामध्ये अहवाल तयार झाला होता. मात्र, हा अहवाल मराठीत होता. तो दुसऱ्या भाषेत तयार करून फेब्रुवारी २०१२ ला दिला. त्यानंतर साहित्य अकादमीने २०१४ रोजी मान्यता दिली. त्यानंतर २०१२४ ला सरकारने मराठीला अभिजात दर्जा दिला. एवढा कालखंड का लागला? याचाही प्रश्न आपण विचारायला हवा."

### आणि बँक फायद्यात आली

मी मुख्यमंत्री झाल्यानंतर रिझर्व बँकेचे गव्हर्नर मला भेटायला आले होते आणि त्यावेळेस राज्य सहकारी बँकेकडे परवाना नाही, ही बाब त्यांनी मला सांगितली होती. त्यानंतर संबंधित विभागाला संबंधितांना विचारणा केली होती, त्यावेळेस त्यांनी सांगितले की अकराशे कोटींचा तोटा आहे. त्यामुळे लायसनसाठी अडचण येत आहे आणि मग तातडीने बोर्ड बारखास्त केलं. प्रशासक नेमला आणि दोन वर्षांमध्ये सातशे कोटींच्या प्रॉफिटमध्ये ही संस्था आली. पुढे लायसन मिळाले, असा किस्सा चव्हाण यांनी सांगितला.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, ''आपल्याला छत्रपती शाहू महाराजांनी पहिल्यांदा पन्नास टक्के आरक्षण दिले. स्वातंत्र्यानंतर मराठा समाज मागास आहे, अशी मान्यता नव्हती. मला वाटतं बेरोजगारी दूर झाली तर आरक्षणाचा एकही प्रश्न उभा राहणार नाही. गेल्या कालखंडामध्ये आपल्याकडे एकही आयटी कंपनी आली नाही, उद्योग आले नाहीत, रोजगार निर्मिती झाली नाही, ही दुर्दैवाची बाब आहे,"

निवडणुकीच्या तोंडावर जातीय तेढ निर्माण करण्याचं आणि धार्मिक दंगली घडवण्याचा प्रयत्न केला जात आहे धार्मिक वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न केला जात आहे, सामाजिक स्वास्थ्य काम कायम ठेवण्याची जबाबदारी सर्वांची आहे, त्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करायला हवेत, असेही चव्हाण म्हणाले.

चिन्ह, पक्ष पळवायचे, सरकार पडायचे हि गोष्ट सर्वसामान्य माणसाला आवडलेली नाही. ४० आमदार फुटले, खोक्यांची विषयी चर्चेत राहिला. त्यानंतर आलेल्या सरकारच्या कालखंडातही भ्रष्टाचार वाढला आहे. पक्षांतर करताना ज्यांना मोबदला मिळाला, ज्या विश्वासाने लोकांनी मते दिली, त्यांनी सौदीबाजी केली. भ्रष्टाचार केला. ही बाब सर्वसामान्य माणसाला पटलेली नाही. ना खाऊगा आणि ना खाने दूंगा...., म्हणणाऱ्या नेत्यांनी महाराष्ट्रमधील सरकार पाडण्यासाठी प्रयत्न झाले. त्यासाठी येथील नाही ते दिल्लीतील दोन नेते जबाबदार आहेत, असेही चव्हाण म्हणाले. निवडणुकीनंतर महाविकास आघाडीतील मुख्यमंत्री कोण असेल? यावर या प्रश्नावर पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, सन १९९९ पासून आघाडीमध्ये एक मुख्यमंत्री पदाचे सूत्र ठरले आहे. ज्यांचे जास्त आमदार त्यांचा मुख्यमंत्री असतो, हा फॉर्मुला आजपर्यंत कायम आहे. त्यातूनच २०१९ मध्ये शिवसेनेबरोबर सरकार स्थापन झाले. त्यात उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री करण्यात आले. निवडणुकीनंतर हेच सूत्र कायम ठेवायचे की बदल करायचा? यावर निवडणुकीनंतरच निर्णय होईल, असं मला वाटतं असेही चव्हाण म्हणाले.

### श्वेतपत्रिका म्हणजे चौकशी नाही

चव्हाण म्हणाले, 'मुख्यमंत्री झाल्यानंतर एका धरणा संदर्भात श्वेतपत्रिका काढली होती. सरकारने काढलेल्या श्वेतपत्रिकेवरून मोठं राजकारण झालं होत, अजित पवारांनी त्यावेळी मंत्री पदाचा ही राजीनामा दीला होता. आपल्याकडे राजकारणी आणि इतरांमध्ये श्वेतपत्रिका म्हणजे चौकशी असा समज आहे. मात्र, श्वेतपत्रिका म्हणजे चौकशी नाही तर सरकारने दिलेली माहिती असते."

---

## अब्दुल सत्तारचे करायचे काय, खाली डोक वर पाय!

### सदस्यांची घोषणाबाजी, सत्तार निघून गेले, निगडीतील प्रकार

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती व सचिव यांनी अब्दुल सत्तारचे करायचे काय. खाली डोक वर पाय, पन्नास खोके एकदम ओक्केच्या घोषणांनी निगडीतील ग. दि. माडगुळकर नाट्यगृह येथे कार्यक्रमात गदारोळ झालेला दिसून आला.**



महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या वतीने राज्यातील बाजार समित्यांच्या कामकाजात करावयाचे कालानुरूप बदल, शेतमालाच्या विपणनामध्ये अंगीकारावयाच्या आधुनिक बाबी, शेतकरी व इतर सर्व बाजार घटकांना द्यावयाच्या सोयी-सुविधा, त्यात येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना इत्यादी विषयाचे अनुषंगाने संवाद साधण्यासाठी राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते झाले. यावेळी अब्दुल सत्तार नियोजित कार्यक्रमाला दीड तास उशिरा पोहचले. तेथे आल्यानंतर केवळ एकाच प्रतिनिधीला बोलण्याचे निर्देश दिले. प्रतिनिधी बोलत असताना सत्तार यांनी त्या प्रतिनिधीला थांबवले. तुम्ही तुमचे प्रश्न मांडा. वाद निर्माण होईल असे वक्तव्य करु नका. मला राज्य मंत्री मंडळाच्या बैठकीला जायचे आहे असे म्हणत परिषदेतून काढता पाय घेतला आणि ते निघून गेले. त्यानंतर सभागृहात गोंधळ सुरूच होता. सदस्यांकडून सत्तार यांच्या विरोधात घोषणाबाजी केली जात होती.

# ते आहेत का आपला आवाज?



## भूमिका

**येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये मतदान करताना मतदारांनी कोणत्या मुद्द्यांचा विचार करायला हवा, आपल्या लोकप्रतिनिधींनी गेल्या पाच वर्षांत कोणती कामे करणे अपेक्षित होते, ती त्यांनी केली आहेत का याचा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लेखाजोखा... 'मावळतीचे मोजमाप' या नव्या सदरात आजपासून...**

लवकरच नव्या, १५ व्या महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जाहीर होईल. या वेळी मावळत्या विधानसभेने लोकहितासाठी काय काम केलं याचा आढावा घेणं आवश्यक. संपर्क या संस्थेने महाराष्ट्राच्या १४ व्या विधानसभेचा (२०१९-२४ या काळातल्या १४ व्या विधानसभेची १२ अधिवेशनं, कामकाजाचे एकूण दिवस १३१) उभा-आडवा अभ्यास केला. आमदार विधानसभा सभागृहात कोणती कामगिरी करतात हा फार दुर्लक्षित राहिलेला विषय आहे. संपर्कने २०१५ पासून ते अभ्यासायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्रात १५ व्या विधानसभेसाठी निवडणूक होऊ घातली आहे. १४ व्या मावळत्या विधानसभेत उपस्थित झालेले ३,७९१ तारांकित प्रश्न आणि २,१३० लक्षवेधी सूचना, दोन्ही मिळून ५,९२१ प्रश्न आम्ही अभ्यासले. एक प्रकारे, विधानसभेचं हे परीक्षण, 'ऑडिट'! कोविडमुळे तीन अधिवेशनं रद्द




केली गेली. आणि अर्थसंकल्पीय, २०२४ अधिवेशनात प्रश्नोत्तरांचा तास रहित केला होता. यामुळे मागील विधानसभेच्या तुलनेत या विधानसभेत आमदारांना प्रश्न उपस्थित करण्याची संधी कमी मिळाली. १४ व्या विधानसभेतल्या अधिवेशनांचे विधिमंडळाच्या वेबसाइटवरचे सर्व उपलब्ध अहवाल आम्ही अभ्यासले. प्रश्नांचं वर्गीकरण केलं. राज्यातल्या सर्व २८८ आमदारांनी मांडलेल्या प्रश्नांविषयीची निरीक्षणं मांडली. असाच अभ्यास, आम्ही १३ व्या विधानसभेचाही (२०१४ ते १९) केला असल्याने, तुलना करण्यासाठी, तेव्हाची निरीक्षणंही आमच्या हाती आहेत.एकूण ५,९२१ प्रश्न भागिले २८८ मतदारसंघ केल्यास सरासरी वीस प्रश्न एका मतदारसंघातून पाच वर्षांत विचारले गेले... म्हणजे वर्षातून फक्त चार. प्रश्न कोणते विचारले, हे नंतर बघू. पण ही संख्या किरकोळ ठरत नाही का? प्रश्नसंख्येवरून आमदारांचे अग्रक्रम कळतात. महिला-बालक यांच्यासंबंधीचे प्रश्न दोन-अडीच टक्क्यांच्या पुढे जात नाहीत, याचा अर्थ ते आमदारांसाठी प्राधान्याचे नाहीत, असा होतो. वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, नागरिकांनी/संस्थांनी दिलेली निवेदनं, मतदारसंघात घडलेल्या घटना यावरून सहसा आमदारांकरवी प्रश्न तयार केले जातात. त्यामुळे प्रश्नांमध्ये प्रासंगिकता जास्त असते. प्रश्नोत्तरांत, चर्चांत सखोलतेचा, व्याप्तीचा अभाव राहतो. राज्यात एक जरी बालमृत्यू झाला, एखाद्या गावात जरी मुलांना पोषण आहार मिळाला नाही किंवा एका जरी स्त्रीवर बलात्कार झाला किंवा आरोग्यसुविधेच्या अभावी एखादा जरी मत्यू झाला, तरी तो तो प्रश्न गंभीर मानून त्यावर सभागृहात चर्चा व्हायला हवी, अशी अपेक्षा असते. मोठा गवगवा झालेल्या दुर्घटनेबाबत तसं घडतंही. पण स्त्रिया-मुलींवरच्या अत्याचाराबाबतचे, बालकुपोषणाचे प्रश्न अगदी सामान्य झाल्यासारखे पुन्हा पुन्हा उपस्थित होत राहतात. त्यामुळे लोकप्रतिनिधींना याबद्दल खरोखरीची आस्था आहे का, अशी शंका वाटावी. जवळपास प्रत्येक जिल्ह्यातून शासकीय रुग्णालयात सिटी स्कॅन मशीनची, ट्रॉमा केअर सेंटरची मागणी आमदार करतात. एखादा धडक कार्यक्रम हाती घेऊन, प्रशासकीय बाबींची, निधीची पूर्तता करून हे मार्गी लावलं तर, अन्य प्रश्नांच्या सोडवणुकीचं काम हाती घेता येणार नाही का? नद्यांमधला अवैध वाळू उपसा, अवैध खाणी हे प्रश्न वारंवार उपस्थित होतात. नद्यांचं प्रदूषण हाही सतत विचारलेला प्रश्न. राज्याच्या नकाशावरच्या सर्वच नद्यांची नावं आळीपाळीने या प्रश्नांत आली आहेत. राज्यातल्या सर्वच एमआयडीसी प्रदूषणकारी आहेत, असं या प्रश्नांतून दिसतं. जिल्हा सहकारी बँका आणि त्यातले घोटाळे, शासकीय यंत्रणांतली रिक्त पदं, अनुशेष आणि प्रलंबित प्रकल्प हे वारंवार आलेले विषय. शासकीय योजनांमधले गैरव्यवहार- घोटाळे या विषयावरची प्रश्नसंख्या सर्वाधिक आहे. हे सगळं गैर रोखण्यासाठीची यंत्रणा तर अस्तित्वात आहे. मग अंमलबजावणी का होत नसेल? उत्तर लोकप्रतिनिधींनीच द्यायचं आहे. ('संपर्क'कडे सर्व प्रश्नांची जिल्हानिहाय यादी उपलब्ध आहे.

## प्रासंगिक »

### ब्रेकिंग न्यूज नाही

***अर्थतज्ज्ञ सांगतात त्या चार आर्थिक निकषांवर मोदी सरकारची कामगिरी तपासून पाहिली असता देशाचे जे चित्र पुढे येते ते निराशाजनक आहे.***

ही ब्रेकिंग न्यूज आहे, पण वेगळी आहे. ती कुणीतरी कायदा मोडला याबद्दलची नाही किंवा कुणीतरी कुणाचे तरी डोके फोडले किंवा घरे तोडली याबद्दलचीही नाही. ब्रेकिंग न्यूज असे म्हणत याआधी पन्नास वेळा सांगून झाली आहे, अशीही ही बातमी नाही.ती कायदे कसे मोडले जात आहेत, याबद्दलची बातमी आहे.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो (एनसीआरबी) ने केलेल्या हिंसक गुन्ह्यांच्या वाढत्या आलेखाच्या दस्तावेजीकरणातूनच ती स्पष्ट होते. एखाद्या दक्षता समितीचे सदस्य एखाद्या तरुण जोडप्याला मारहाण करतात किंवा एखाद्या व्यक्तीची हत्या करतात तेव्हा डोके फोडले आणि हाडे मोडली अशी बातमी दिली जाते. सरकारी अधिकारी कथित अतिक्रमणे पाडण्यासाठी बुलडोझर घेऊन जातात तेव्हा घरे तोडल्याच्या बातम्या दिल्या जातात.

मुंबई विद्यापीठात नुकत्याच झालेल्या निवडणुकीने विद्यापीठांमधील राजकारण, त्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग, विद्यापीठीय राजकारणातील राजकीय पक्षांची उपस्थिती या मुद्द्यांची चर्चा सुरू झाली आहे. या निमित्ताने राज्यातील विद्यापीठांमधील राजकीय वातावरणाचे चित्र तपासून पाहिले असता काय दिसते?

# शिक्षणाच्या प्रांगणातील राजकीय गणिते!

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेतील पदवीधर गटाची निवडणूक नुकतीच झाली. युवासेनेने (ठाकरे गट) दहाही जागांवरील आपले वर्चस्व निर्विवाद राखले. अनेक चढउतारांनंतर झालेल्या या निवडणुकीत युवासेनेने मिळवलेला विजय अभिनंदनास पात्र आहे, हे खरेच. मात्र, विजयाइतकेच ही निवडणूक व्हावी यासाठी युवासेनेने घेतलेले कष्ट हे अभिनंदनास अधिक पात्र आहेत, असे म्हणावे लागेल. खरेतर एकतर्फी म्हणावी अशाच या निवडणुकीत ती होऊ नये म्हणून झालेल्या प्रयत्नांमुळे युवासेनेचा विजय अधिक गाजला. मुळात विद्यापीठाच्या अधिसभेतील अवघ्या दहा जागांसाठी ही निवडणूक झाली. त्याचे मतदार होते साधारण साडेतेरा हजार आणि त्यात मतदान झाले साधारण ५५ टक्के. या सगळ्याचा विचार करता या निवडणुकीचा जीव हा महापालिकेच्या एका वॉर्डशी तुलना करावी इतकाही म्हणता येणार नाही. त्यात मुंबई विद्यापीठाच्या या अधिसभेवर गेल्या अनेक वर्षांपासून




युवासेनेचे वर्चस्व आहे. त्यात त्यांच्या समोर आव्हान होते ते गेली काही वर्षे प्रयत्न करूनही मुंबई विद्यापीठात अजूनही पुरती पाळेमुळे घट्ट करू न शकलेल्या अभाविपचे आणि काही अंशी छात्र भारतीचे. त्यामुळे १०-१५ वर्षे ताकदीने अधिसभा गाजवलेल्या आणि विद्यापीठातील कानाकोपऱ्यातील राजकारणात मुरलेल्या उमेदवारांचा पराभव होता तरच नवल. मात्र तरीही निवडणूक कमालीची चर्चेची, उत्सुकतेची ठरली. एरवी विद्यापीठ वर्तुळात चर्चिली जाणारी ही निवडणूक सामान्य माणसाचे औत्सुक्य चाळवून गेली. कारण मुळात ही निवडणूक होऊच नये, यासाठी झालेले प्रयत्न. अगदी निकालाच्या दिवशीपर्यंत न्यायालयात पोहोचलेले वाद. निवडणूक लांबणीवर टाकण्याच्या प्रयत्नांमुळे युवासेनेचा (ठाकरे गट) विजयाचा उत्साह अधिक वाढवला. त्यात येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर मिळालेल्या या विजयाच्या निमित्ताने चालून आलेली शक्तिप्रदर्शनाची संधी युवासेना (ठाकरे गट) आणि त्यांचा पालक पक्ष म्हणजे शिवसेना (ठाकरे गट) यांच्यासाठी नक्कीच जमेची ठरली. या विजयाचा अर्थ निवडणुकीचा भाग असलेल्या आणि नसलेल्या सर्व पक्षांनी आपापल्या पातळीवर जाहीर केलाच आहे. मात्र, दिसणाऱ्या या चित्राच्या मागे अनेक अनुत्तरित प्रश्न दडलेले आहेत. मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेची ही निवडणूक तब्बल दोन वर्षे रखडली. ही निवडणूक होणे अपेक्षित होते, तेव्हा यातील लाभार्थी पक्षांची स्थिती वेगळी होती. शिवसेनेतील फुटीनंतर ओघाने युवासेनाही फुटली. त्यामुळे अभिसभेतील युवासेनेच्या निवडून आलेले सदस्यही विभागले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मी चांगल्या चांगल्यांचे मुडदे पाडलेत!


## रावसाहेब दानवेंचा इशारा; खोतकरांनीही सुनावलं

।बारामती।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभेची निवडणूक लवकरच जाहीर होणार आहे. त्यामुळे राज्यात अनेक राजकीय घडामोडी घडत असल्याचं पाहायला मिळत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरु केली आहे. राज्यभरात वेगवेगळ्या मतदारसंघात अनेक नेत्यांचे दौरे सुरु असून मतदारसंघाची आणि उमेदवारांची चाचपणी या माध्यमातून करण्यात येत आहे. यातच महायुतीमधील पक्षांमध्ये जागावाटपाबाबत खलबतं सुरु आहेत. मात्र, विधानसभेच्या काही मतदारसंघावरून महायुतीमध्ये धुसफूस सुरु असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.**





यातच भारतीय जनता पार्टीचे नेते, माजी खासदार रावसाहेब दानवे आणि शिवसेना (शिंदे) नेते अर्जुन खोतकर यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु झाले आहेत. भारतीय जनता पक्षाच्या मेळाव्यामध्ये बोलताना माजी खासदार रावसाहेब दानवे यांनी अर्जुन खोतकर यांचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला. “मी चांगल्या चांगल्यांचे मुडदे पाडले आहेत. कच्च्या गोट्या खेळलेलो नाही”, असं रावसाहेब दानवे म्हणाले. त्यानंतर प्रत्युत्तर देताना अर्जुन खोतकरांनीही आज तुम्ही जात्यात आहात तर आम्ही सुपात, उद्या आम्ही जात्यात असू तुम्ही जात्यात याल, असं सूचक विधान करत रावसाहेब दानवे यांना इशारा दिला.“आम्ही महायुतीमधील माणसं आहोत. आम्ही बेईमानी करणार नाहीत. आता काही माणसं असं म्हणत आहेत की रावसाहेब दानवेंचा पराभव हा आमच्यामुळे झाला. पण मी सांगतो रावसाहेब दानवे हा माणूस कच्च्या गोट्या खेळलेला नाही. मी चांगल्या चांगल्यांचे मुडदे पाडलेत”, असं म्हणत रावसाहेब दानवे यांनी शिवसेनेच्या (शिंदे) अर्जुन खोतकरांवर टीका केली.“कोणी कोणाला भिती दाखवण्याची गरजच नाही. निवडणुका कायम येत राहतात. आज तुम्ही जात्यात आहात तर आम्ही सुपात, उद्या आम्ही जात्यात असू तर तुम्ही जात्यात याल. त्यामुळे अशा प्रकारचं चक्र सुरुच राहत असतं”, असं प्रत्युत्तर अर्जुन खोतकर यांनीही नाव न घेता रावसाहेब दानवे यांना दिलं. दरम्यान, एकीकडे विधानसभेची निवडणूक महायुती एकत्र लढवणार असल्याचे वरिष्ठ नेते सांगतात. मात्र, दुसरीकडे महायुतीमधील नेत्यांमध्येच आरोप-प्रत्यारोप सुरु असल्यामुळे महायुतीमध्ये धुसफूस सुरु असल्याची चर्चा आहे. यातच रावसाहेब दानवे यांनी केलेले विधान चर्चेत आले असून जालन्यात महायुतीमधील वाद आता चव्हाट्यावर आला आहे. भारतीय जनता पार्टीचे नेते, माजी खासदार रावसाहेब दानवे आणि शिवसेना (शिंदे) नेते अर्जुन खोतकर यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु झाले आहेत. भारतीय जनता पक्षाच्या मेळाव्यामध्ये बोलताना माजी खासदार रावसाहेब दानवे यांनी अर्जुन खोतकर यांचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला. “मी चांगल्या चांगल्यांचे मुडदे पाडले आहेत. कच्च्या गोट्या खेळलेलो नाही”, असं रावसाहेब दानवे म्हणाले. त्यानंतर प्रत्युत्तर देताना अर्जुन खोतकरांनीही आज तुम्ही जात्यात आहात तर आम्ही सुपात, उद्या आम्ही जात्यात असू तुम्ही जात्यात याल, असं सूचक विधान करत रावसाहेब दानवे यांना इशारा दिला.“आम्ही महायुतीमधील माणसं आहोत. आम्ही बेईमानी करणार नाहीत. आता काही माणसं असं म्हणत आहेत की रावसाहेब दानवेंचा पराभव हा आमच्यामुळे झाला. पण मी सांगतो रावसाहेब दानवे हा माणूस कच्च्या गोट्या खेळलेला नाही. मी चांगल्या चांगल्यांचे मुडदे पाडलेत”, असं म्हणत रावसाहेब दानवे यांनी शिवसेनेच्या (शिंदे) अर्जुन खोतकरांवर टीका केली.“कोणी कोणाला भिती दाखवण्याची गरजच नाही. निवडणुका कायम येत राहतात. आज तुम्ही जात्यात आहात तर आम्ही सुपात, उद्या आम्ही जात्यात असू तर तुम्ही जात्यात याल. त्यामुळे अशा प्रकारचं चक्र सुरुच राहत असतं.

### अर्जुन खोतकर काय म्हणाले?

भारतीय जनता पार्टीचे नेते, माजी खासदार रावसाहेब दानवे आणि शिवसेना (शिंदे) नेते अर्जुन खोतकर यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु झाले आहेत. भारतीय जनता पक्षाच्या मेळाव्यामध्ये बोलताना माजी खासदार रावसाहेब दानवे यांनी अर्जुन खोतकर यांचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला. असं रावसाहेब दानवे म्हणाले. त्यानंतर प्रत्युत्तर देताना अर्जुन खोतकरांनीही आज तुम्ही जात्यात आहात तर आम्ही सुपात, उद्या आम्ही जात्यात असू तुम्ही जात्यात याल, असं सूचक विधान करत रावसाहेब दानवे यांना इशारा दिला.

---

# ‘कधीही ब्रेकिंग न्यूज मिळू शकेल’

## नीलम गोऱ्हे यांचं अजित पवार गटाबाबत सूचक विधान

।मुंबई।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०२२ साली बंड केल्यानंतर शिवसेनेतील अनेक नेते त्यांच्याबरोबर आले. विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे याही काही काळाने शिंदे गटात सामील झाल्या होत्या. तसेच शिंदेंबरोबर कायम राहिलेले बच्चू कडू हे आता त्यांची साथ सोडत आहेत.**



आगामी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता कोणत्याही क्षणी जाहीर होण्याची शक्यता आहे. त्याआधी प्रत्येक पक्ष आपापले मतदारसंघ आणि उमेदवार निश्चिती करत आहे. उमेदवारही या पक्षातून त्या पक्षात जाण्याची तयारी करत असताना डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केलेले एक विधान सध्या चर्चेत आहे. “पत्रकारांनी अलर्ट राहावे, कधीही ब्रेकिंग न्यूज मिळू शकेल”, असे सूचक विधान त्यांनी केले आहे.सोलापूर दौऱ्यावर आल्या असताना गोऱ्हे म्हणाल्या की, राज्याचे राजकारण दर तीन दिवसांनी बदलत आहे. आमचेही सर्व लोक निवडणुका लढण्यासाठी तयार आहेत. भाजपाची आमची युती खूप जुनी आहे. पण पत्रकारांनी ब्रेकिंग न्यूजसाठी अलर्ट राहावं. कधीही ब्रेकिंग न्यूज येऊ शकते. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष स्वतंत्र निवडणूक लढविणार का? असा प्रश्न यावेळी गोऱ्हे यांना विचारण्यात आला. पण त्यांनी हसून यावर उत्तर देणे टाळले. त्या म्हणाल्या, “मी असा कोणताही दावा केलेला नाही.

### संशय निर्माण करण्यासारखं होईल

माझ्या तोंडी हे शब्द घालू नका. पण राजकारण बदलत आहे. काही जण अचानक निवडणुकीला उभं राहणार नसल्याचं सांगतात. मग सांगतात मुलाला उभं करणार. मुलगा काहीतरी वेगळं बोलतो. विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांना मी अनेक वर्षांपासून ओळखते. पण ते मंत्रालयात जाळीवर उडी मारण्यापर्यंत आंदोलन करतील, असं कधी वाटलं नव्हतंनरेंद्र मोदी यांच्या बैठकांना मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री एकत्र होते. त्यामुळे त्यांच्याबाबत (अजित पवार) सारखं सारखं काही बोलत राहणं हे संशय निर्माण करण्यासारखं होईल.

# संघाच्या माजी नेत्यामुळं गोव्यात तणाव!

## ख्रिश्चन समुदायाकडून आंदोलन तर राहुल गांधींची भाजपावर टीका

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गोव्यामध्ये जातीय तणाव निर्माण झाला असून ख्रिश्चन समुदाय रविवारी रस्त्यावर उतरला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गोवा राज्याचे माजी प्रमुख सुभाष वेलिंगकर यांना अटक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. शुक्रवारी त्यांनी ख्रिश्चन मिशनरी संत फ्रान्सिस झेवियर यांच्याबद्दल वादग्रस्त विधान केल्यानंतर गोव्यात नाराजीचे वातावरण पसरले आहे. स्थानिक लोक आणि राजकीय नेते जुन्या गोव्यात जमू लागले असून त्यांच्याकडून निषेध आंदोलन करण्यात येत आहे. दरम्यान पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सुभाष वेलिंगकर फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. याआधीही त्यांच्यावर चिथावणीखोर विधाने केल्याचे अनेक गुन्हे दाखल आहेत.**



रविवारी गोव्यात ख्रिश्चन समुदायाने आंदोलनाला उतरत असताना समविचारी लोकांना दक्षिण गोव्यातील मडगाव येथे निदर्शन करण्यासाठी जमण्याचे आवाहन केले. शनिवारी काही आंदोलकांनी मडगाव येथे राष्ट्रीय महामार्ग रोखून धरण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांबरोबर काही वेळ झटापट झाली. इतरांना पांगविण्याचा प्रयत्न केला.दरम्यान गोवा चर्च प्राधिकरणाने लोकांना शांततेचे आवाहन केले आहे. तसेच निदर्शने थांबवावीत असेही आवाहन केले. गोव्यातील घडामोडींवर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपाला जबाबदार धरत टीका केली. राहुल गांधी यांनी केलेल्या एक्स पोस्टमध्ये म्हटले की, भाजपा जाणूनबुजून जातीय तणाव निर्माण करत आहे. गोव्यातील सुसंस्कृत आणि सुसंवादाचे वातावरण भाजपाच्या काळात विस्कळीत झाल्याचाही आरोप त्यांनी केला.राहुल गांधी पुढे म्हणाले,“भाजपा जाणूनबुजून जातीय तणाव निर्माण करत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका माजी नेत्याने मुद्दामहून मुस्लीमांवर आर्थिक निर्बंध टाकण्याचे आवाहन ख्रिश्चनांना केले. संपूर्ण भारतात आरएसएसकडून अशाचप्रकारच्या कृती करण्यात येत असून त्यांच्या या आवाहनाला अतिशय वरच्या पातळीवरून समर्थन मिळत आहे.” गोव्यातील जनता आणि संपूर्ण भारतातील लोक हे फुटीरतावादी षडयंत्र पाहत असून याविरोधात एकत्र येत आहेत. सुभाष वेलिंगकर यांच्या विरोधात धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी आतापर्यंत १२ खटले दाखल झालेले आहेत. संत फ्रान्सिस झेवियर यांना गोव्याचे रक्षक म्हटले जाते. त्यांचे अवशेष आजही जुन्या गोव्यातील बॅसिलिका ऑफ बॉम जीझस चर्चमध्ये ठेवलेले आहेत. दरम्यान सुभाष वेलिंगकर फरार असून त्यांनी शनिवारी स्थानिक न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला. मात्र त्यांची याचिका फेटाळून लावण्यात आली. आता या प्रकरणाची सुनावणी सोमवारी होणार आहे.रविवारी गोव्यात ख्रिश्चन समुदायाने आंदोलनाला उतरत असताना समविचारी लोकांना दक्षिण गोव्यातील मडगाव येथे निदर्शन करण्यासाठी जमण्याचे आवाहन केले. शनिवारी काही आंदोलकांनी मडगाव येथे राष्ट्रीय महामार्ग रोखून धरण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांबरोबर काही वेळ झटापट झाली. पोलिसांनी पाच आंदोलकांना ताब्यात घेऊन इतरांना पांगविण्याचा प्रयत्न केला.दरम्यान गोवा चर्च प्राधिकरणाने लोकांना शांततेचे आवाहन केले आहे. तसेच निदर्शने थांबवावीत असेही आवाहन केले. गोव्यातील घडामोडींवर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपाला जबाबदार धरत टीका केली. राहुल गांधी यांनी केलेल्या एक्स पोस्टमध्ये म्हटले की, भाजपा जाणूनबुजून जातीय तणाव निर्माण करत आहे. गोव्यातील सुसंस्कृत आणि सुसंवादाचे वातावरण भाजपाच्या काळात विस्कळीत झाल्याचाही आरोप त्यांनी केला.राहुल गांधी पुढे म्हणाले,“भाजपा जाणूनबुजून जातीय तणाव निर्माण करत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका माजी नेत्याने मुद्दामहून मुस्लीमांवर आर्थिक निर्बंध टाकण्याचे आवाहन ख्रिश्चनांना केले.

### माजी नेत्यामुळं गोव्यात तणाव

संपूर्ण भारतात आरएसएसकडून अशाचप्रकारच्या कृती करण्यात येत असून त्यांच्या या आवाहनाला अतिशय वरच्या पातळीवरून समर्थन मिळत आहे.” गोव्यातील जनता आणि संपूर्ण भारतातील लोक हे फुटीरतावादी षडयंत्र पाहत असून याविरोधात एकत्र येत आहेत. सुभाष वेलिंगकर यांच्या विरोधात धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी आतापर्यंत १२ खटले दाखल झालेले आहेत. संत फ्रान्सिस झेवियर यांना गोव्याचे रक्षक म्हटले जाते. त्यांचे अवशेष आजही जुन्या गोव्यातील बॅसिलिका ऑफ बॉम जीझस चर्चमध्ये ठेवलेले आहेत. दरम्यान सुभाष वेलिंगकर फरार असून त्यांनी शनिवारी स्थानिक न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला. मात्र त्यांची याचिका फेटाळून लावण्यात आली.

# परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर पाकिस्तानात जाणार

## एस. जयशंकर यांनी एका प्रश्नांवर दिलेल्या उत्तरामुळे चांगलेच चर्चेत

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशाचे परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर हे नेहमीच त्यांच्या मुत्सद्दी प्रतिक्रियांसाठी ओळखले जातात. आता देखील एस.जयशंकर यांनी एका प्रश्नांवर दिलेल्या उत्तरामुळे चांगलेच चर्चेत आले आहेत. एस. जयशंकर यांना एका मुलाखतीत विचारण्यात आलं होतं की,किम जोंग उन आणि अमेरिकन उद्योगपती जॉर्ज सोरोस यांच्याबरोबर रात्रीचे जेवण करण्याची संधी मिळाली तर तुम्हाला कोणाबरोबर जेवण करायला आवडेल?**

यावर मंत्री एस. जयशंकर यांनी अतिशय मजेशीर उत्तर दिलं.मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं की, “आता नवरात्रीचे दिवस सुरू आहेत. त्यामुळे मला उपवास करायला आवडेल”, असं मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं. त्यांनी दिलेल्या या उत्तराची सध्या सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे. एस जयशंकर यांनी याआधीही अनेकवेळा आपल्या उत्तरांनी सर्वांना आश्चर्यचकित केले होते. आता एका मुलाखतीत यासंदर्भातील प्रश्न त्यांना विचारण्यात आला होता. त्या प्रश्नावर त्यांनी दिलेल्या उत्तराची सध्या चर्चा रंगली आहे.दरम्यान, एस.जयशंकर



हे जागतिक मंचावर अनेक प्रश्नांची आपल्या खास शैलीत उत्तरे देत असतात. याआधी युक्रेनमधील युद्धादरम्यान भारत आणि रशियासंदर्भात त्यांना प्रश्न विचारण्यात आला होता. तेव्हा देखील त्यांनी दिलेल्या उत्तरावर मोठी चर्चा झाली होती, तसेच त्यांच्यावर टीकाही झाली होती. मात्र, त्यांनी टीकाकारांना चोख प्रत्युत्तर दिले होते. दरम्यान, मंत्री एस.जयशंकर यांना ज्यांच्या संदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता, ते अमेरिकन उद्योगपती जॉर्ज सोरोस आणि उत्तर कोरियाचे अध्यक्ष किम जोंग उन आहेत. आता अमेरिकेचे उद्योगपती जॉर्ज सोरोस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर अनेकदा टीका देखील केली होती. अदाणी प्रकरणासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्टीकरण द्यायला हवं, असंही जॉर्ज सोरोस यांनी म्हटलं होतं. एवढंच नाही तर जॉर्ज सोरोस यांनी भारतातील लोकशाही आणि पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वावर प्रश्न उपस्थित केले होते. ९२ वर्षीय जॉर्ज सोरोस यांचा कोणताही राजकीय पक्ष नाही. मात्र, ते अनेकदा जगभरातील नेत्यांवरही टीका करत असतात.

### एस.जयशंकर पाकिस्तानात जाणार

भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर या महिन्याच्या अखेरीस शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशनमध्ये सहभागी होण्यासाठी पाकिस्तानला भेट देणार आहेत. पाकिस्तानात जाणारे ते गेल्या नऊ वर्षांतील पहिले परराष्ट्र मंत्री ठरतील.आता मंत्री एस जयशंकर १५ आणि १६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशनच्या बैठकीसाठी पाकिस्तानला जाणार आहेत. एस जयशंकर यांनी याआधीही अनेकवेळा आपल्या उत्तरांनी सर्वांना आश्चर्यचकित केले होते.



# पाचव्या दिवशी केली जाते स्कंदमातेची पूजा

वरात्रीचा पाचवा दिवस स्कंदमातेला समर्पित असतो. या दिवशी स्कंदमातेची विधीवत पूजा, अर्चना केली जाते. स्कंदमाता हे देवी पार्वतीचे दुसरे रूप मानले जाते. तिच्या मुलाचे नाव स्कंदकुमार असल्याने तिचे नाव स्कंदमाता पडले. शास्त्रानुसार स्कंदमाता नकारात्मक शक्तींचा नाश करून जीवनात सुख-समृद्धी आणते.

## स्कंदमातेची पूजा विधी आणि मंत्र

सर्व प्रथम ब्रह्म मुहूर्तावर उठून स्नान करावे. त्यानंतर पिवळे वस्त्र परिधान करून स्कंदमातेच्या मूर्तीसमोर किंवा प्रतिमेसमोर बसावे. देवीला पिवळी फुले व हार अर्पण करून पिवळ्या वस्तू अर्पण करा. देवीच्या मूर्तीसमोर दिवा लावा आणि व्रत कथा वाचावी. यानंतर मंत्रोच्चार करून देवीची आरती करावी.

## स्कंदमातेची व्रत कथा

धार्मिक मान्यतेनुसार, तारकासुर नावाचा एक असुर होता. तारकासुरला वाटले की महादेवाचे लग्न होणार नाही आणि त्यांना पूत्रही होणार नाही. त्यामुळे तो अमर आहे. तारकासुराने देवलोकात दहशत निर्माण केली तेव्हा सर्व देवतांनी महादेवाला लग्न करण्याची विनंती केली. महादेवाने माता पार्वतीशी विवाह केला आणि स्कंदकुमार नावाच्या पुत्राला



## -: मंत्र :-

या देवी सर्वभूतेषु
मातृरूपेण संस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै
नमस्तस्यै नमो नम।।
सिंहासनगता नित्यं
पद्माश्रितकरद्वया।
शुभदास्तु सदा
देवी स्कन्दमाता यशस्विनी।।

स्कंदमातेची आरती

जय तेरी हो स्कंद माता,
पांचवा नाम तुम्हारा आता।
सब के मन की जानन हारी,
जग जननी सब की महतारी।
तेरी ज्योत जलाता रहूं मैं,
हरदम तुम्हे ध्याता रहूं मैं।

कई नामो से तुझे पुकारा,
मुझे एक है तेरा सहारा।
कहीं पहाड़ों पर है डेरा,
कई शहरों में तेरा बसेरा।

हर मंदिर में तेरे नजारे गुण गाये,
तेरे भगत प्यारे भगति।
अपनी मुझे दिला दो शक्ति,
मेरी बिगड़ी बना दो।

इन्दर आदी देवता मिल सारे,
करे पुकार तुम्हारे द्वारे।
दुष्ट दत्य जब चढ़ कर आये,
तुम ही खंडा हाथ उठाये।
दासो को सदा बचाने आई,
चमन की आस पुजाने आई।

# बांगलादेशचा 7 विकेट्सनी उडवला धुव्वा!

## सूर्याच्या नेतृत्त्वाखाली टीम इंडियाने फडकावली विजयी पताका

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**टीम इंडियाने शानदार गोलंदाजीनंतर कर्णधार सूर्यकुमार यादव आणि अष्टपैलू हार्दिक पंड्या यांच्या शानदार फलंदाजीमुळे भारतीय संघाने ग्वाल्हेर येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या टी-२० सामन्यात बांगलादेशचा सात विकेट्स राखून पराभव केला आणि तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.**




### बांगलादेशवर दणदणीत विजय

प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने १९.५ षटकांत १२७ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघाने ११.५ षटकांत तीन गडी गमावून १३२ धावा करून सामना जिंकला. भारतातर्फे सर्वाधिक धावा हार्दिकने केल्या, त्याने १६ चेंडूंत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने नाबाद ३९ धावा केल्या. हार्दिकशिवाय कर्णधार सूर्यकुमारनेही आक्रमक फलंदाजी करत १४ चेंडूंत दोन चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने २९ धावा केल्या. पहिला सामना खेळणारा नितीश रेड्डीही १५ चेंडूत १६ धावा करून नाबाद परतला. तत्पूर्वी संजू सॅमसननेही शानदार फलंदाजी केली.

प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने १९.५ षटकांत १२७ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघाने ११.५ षटकांत तीन गडी गमावून १३२ धावा करून सामना जिंकला. भारतातर्फे सर्वाधिक धावा हार्दिकने केल्या, त्याने १६ चेंडूंत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने नाबाद ३९ धावा केल्या. हार्दिकशिवाय कर्णधार सूर्यकुमारनेही आक्रमक फलंदाजी करत १४ चेंडूंत दोन चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने २९ धावा केल्या. पहिला सामना खेळणारा नितीश रेड्डीही १५ चेंडूत १६ धावा करून नाबाद परतला. तत्पूर्वी संजू सॅमसननेही शानदार फलंदाजी केली. त्याने १९ चेंडूचा सामना करताना ६ आकर्षक चौकारांच्या मदतीने २९ धावांचे योगदान दिले होते. बांगलादेशकडून मुस्तफिजुर रहमान आणि मेहदी हसन मिराज यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने १९.५ षटकांत सर्वबाद १२७ धावा केल्या. यादरम्यान मेहदी हसन मिराजने ३५ धावांची चांगली खेळी केली. त्याने ३२ चेंडूंचा सामना करत ३ चौकार मारले. झाकीर अलीने एका षटकाराच्या मदतीने ८ धावा केल्या. कर्णधार शांतोने २५ चेंडूत २७ धावा केल्या. त्याने एक चौकार आणि एक षटकार मारला. तस्किन अहमदने १२ धावा केल्या. परवेझ हुसेनने ८ धावा केल्या. तर लिटन दास ४ धावा करून बाद झाला. अर्शदीप सिंगने भारतासाठी घातक गोलंदाजी केली. त्याने १४ धावांत ३ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर वरुणने ३१ धावांत ३ विकेट्स घेतल्या. मयंक यादव, हार्दिक पांड्या आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. हा मयंकचा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सामना होता. त्याने ४ षटकात २१ धावा देऊन एक विकेट घेतली. तसेच त्याने एक मेडन ओव्हर देखील टाकली.भारत आणि बांगलादेश यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना भारताने ७ विकेट्सने आणि ४९ चेंडू शिल्लक ठेवत जिंकला आहे. भारताच्या गोलंदाजांनी प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांगलादेशला १२७ धावांवर सर्वबाद केले. भारतीय संघात कमबॅक केलेल्या वरूण चक्रवर्तीने ३ विकेट्स घेत दमदार कमबॅक केले आहे. तर पदार्पणवीर मयांक यादवने मेडेन विकेट घेत आपले पदार्पण अधिक खास केले. तर बांगलादेशच्या १२८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांनी चांगली सुरूवात केली पण अभिषेक लवकर बाद झाला. नंतर आलेल्या सूर्यकुमार यादवे संजूबरोबर झटपट धावा केल्या. हे दोघेही बाद झाल्यानंतर हार्दिक आणि पदार्पणवीर नितीश रेड्डीने भारताचा डाव सावरत ४९ चेंडू शिल्लक असताना भारताला विजय मिळवून दिला.दोन चौकार आणि एका षटकारासह आपला फॉर्म दाखवणाऱ्या अभिषेक शर्माच्या रूपात भारताला मोठा धक्का बसला आहे. दुसऱ्या षटकातील अखेरच्या चेंडूवर संजूने चेंडू खेळला आणि अभिषेक नॉन स्ट्राईकर एंडवरून धावायला गेला अन् तितक्यात चेंडू थ्रो केल्याने अभिषेक परत येण्यापूर्वी धावबाद झाला. ७ चेंडूत १६ धावा करत अभिषेक बाद झाला.प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने १९.५ षटकांत १२७ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारतीय संघाने ११.५ षटकांत तीन गडी गमावून १३२ धावा करून सामना जिंकला. भारतातर्फे सर्वाधिक धावा हार्दिकने केल्या, त्याने १६ चेंडूंत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने नाबाद ३९ धावा केल्या. हार्दिकशिवाय कर्णधार सूर्यकुमारनेही आक्रमक फलंदाजी करत १४ चेंडूंत दोन चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने २९ धावा केल्या. पहिला सामना खेळणारा नितीश रेड्डीही १५ चेंडूत १६ धावा करून नाबाद परतला. तत्पूर्वी संजू सॅमसननेही शानदार फलंदाजी केली. आकर्षक चौकारांच्या मदतीने २९ धावांचे योगदान दिले होते. बांगलादेशकडून मुस्तफिजुर रहमान आणि मेहदी हसन मिराज यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# भारताचा पाकिस्तानवर शानदार विजय

## भारताने पाकिस्तानचा 6 विकेट्सने पराभव करत पहिला विजय मिळवला

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**टी-२० महिला विश्वचषक २०२४ मध्ये भारताने पाकिस्तानचा ६ विकेट्सने पराभव करत पहिला विजय मिळवला आहे. कर्णधार हरमनप्रीत कौर रिटायर्ड हर्ट झाल्यानंतर मैदानात आलेल्या सजना सजीवनने पहिल्याच चेंडूवर चौकार लगावत भारताने पाकिस्तानचा पराभव केला आहे.**




### भारताला मोठ्या विजयाची गरज

कर्णधार फातिमाने २ चौकार मारत सामना वळवण्याचा प्रयत्न केला पण आशा शोभनाने तिला रिचा घोषकरवी बाद करत मोठी विकेट मिळवून दिली. भारतीय गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. रेणुका सिंगने पहिल्याच षटकात विकेट मिळवली. तर दीप्ती शर्मा, आशा शोभना यांनी प्रत्येकी १ विकेट मिळवली. श्रेयंका पाटीलने २ विकेट तर सामनावीर ठरलेल्या अरूंधती रेड्डीने सर्वाधिक ३ विकेट घेतले.

या मोठ्या सामन्यात पाकिस्तान संघाने नाणेफेक जिंकून भारताविरुद्ध प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय मात्र पाकिस्तानसाठी योग्य ठरला नाही. आणि पाकिस्तानने ठराविक अंतराने विकेट्स गमावत निर्धारित २० षटकांत १०५ धावा केल्या. भारतीय गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत पाकिस्तानी संघावर दबाव कायम ठेवला. पाकिस्तानविरूद्धच्या सामन्यात अरूंधती रेड्डिने १९ धावा देत ३ विकेट्स घेतल्याने तिला सामनावीराचा पुरस्कार मिळाला आहे.भारताने कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा पराभव केला आहे. भारतीय संघाला पहिल्या टी-२० वर्ल्डकप सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला होता. यानंतर उत्कृष्ट गोलंदाजी केल्यानंतर आऊटफिल्ड स्लो असल्याने १०६ धावसंख्येचं लक्ष्य गाठण्यासाठीही भारताला खूप प्रयत्न करावे लागले. भारताकडून शफाली वर्मने आठव्या षटकात पहिला चौकार लगावला. भारतीय संघाचा नेट रनरेट चांगला नसल्याने टीम इंडिया गुणतालिकेत अखेरच्या स्थानी आहे. पण या विजयानंतर टीम इंडियाने २ गुण मिळवत एका स्थानाची झेप घेतली आहे. पण तरीही भारताचा नेटरेनरेट अजूनही – 1.22 आहे.पाकिस्तानकडून अनुभवी फलंदाज निदा दार हिने २८ धावांची मोठी खेळी केली.